**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**
आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांकः- १५/०६/२०१८

**अवैध धंदयांवर ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची धडक कारवाई**

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेशान्वये जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी धडक कारवाई सुरू आहे. ग्रामीण पोलीस दलाचे विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गेल्या आठवडयात निफाड,सायखेडा, पिंपळगाव व दिंडोरी परिसरात अवैधरित्या सुरू असलेले मटका-जुगार अड्डयांवर छापे टाकुन कारवाई केली.

सदर कारवाईत विशेष पोलीस पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. सुरेश चौधरी यांचे पथकाने **पिंपळगाव बसवंत परिसरातील वणी चौफुली परिसरात** अवैधरित्या सुरू असलेले जुगार अड्डयावर अचानक छापा टाकुन, सदर ठिकाणी अंक आकडयांवर पैसे लावुन कल्याण नावाचा मटका जुगार खेळणारे व खेळविणारे इसम नामे १) रमेश तुकाराम गांगुर्डे, रा. राजवाडा पिंपळगाव, २) संजय गंगाराम गांगुर्डे, रा. आंबेडकर नगर, पिंपळगाव, ३) दशरथ पुंडलिक सुर्यवंशी, रा. आंबिका नगर, पिंपळगाव यांचेवर महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२ अ प्रमाणे कारवाई करून सुमारे १०,२००/- रू. रोख व जुगाराचे साहित्य साधने जप्त केले आहे. तसेच **सायखेडा परिसरातील पाण्याचे टाकीजवळ** अवैधरित्या सुरू असलेले मटका-जुगार अड्डयावर छापा टाकुन, सदर ठिकाणी कल्याण नावाचा मटका खेळणारे इसम नामे १) चंद्रभान रामभाउ निकम, रा. ओढा, ता.जि.नाशिक, २) प्रदिप भालचंद्र शिपमे, रा. सायखेडा, ३) आदिल सलीम शेख, रा.चाटोरी, ता. निफाड, ४) मतीन पटेल, रा. चाटोरी, ता.निफाड यांचेवर कारवाई करून ९,१५०/- रूपये रोख हस्तगत करण्यात आले.

तसेच **निफाड तालुक्यातील नांदुर्डी गावात** अवैधरित्या मटका जुगाराचा अड्डा चालविणारा इसम नामे रामदास अशोक पगारे, रा. जळगाव,ता.निफाड यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन मटका जुगाराचे साहित्य साधने व रोख रूपये असा एकुण ६,५६० रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्याचेविरूध्द निफाड पो.स्टे. ला महाराष्ट्र जुगारबंदी कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच **दिंडोरी तालुक्यातील जउळके शिवारात** अवैधरित्या ५२ पत्त्यांवर पैसे लावुन तिन पत्ती नावाचा जुगार खेळणारे व खेळविणारे इसमांवर छापा टाकुन सदर ठिकाणावर इसम नामे १) किस्मत उर्फ बाबा फरजन खान, रा. दहावा मैल, ओझर, ता.निफाड, २) अफरोज सलीम पठाण, रा. पंचशिलनगर, ओझर, ३) विजय कडु बाशिंदे, रा. आनंदवल्ली, नाशिक, ४) युसूफ अब्दुल लतिफ खान, रा. वडाळागाव, नाशिक, ५) राहुल युराज आहिरे, रा. दिक्षी, सुकेणा रोड, ता.निफाड यांचे कब्जातुन जुगाराचे साहित्य साधने व रोख असा एकुण ९८,२००/- रू. मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यांचेविरूध्द दिंडोरी पोलीस ठाणेस महाराष्ट्र जुगारबंदी कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाचे **पोलीस उपनिरीक्षक श्री. सुरेश चौधरी** यांचे पथकाने जिल्हयातील निफाड,सायखेडा, पिंपळगाव व दिंडोरी परिसरतील अवैधरित्या सुरू असलेले मटका-जुगार अड्डयांवर छापे टाकुन १२ जुगारी इसमांवर कारवाई केली असुन १,२४,११०/- रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आगामी काळात अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी सतत कारवाई सुरू राहणार आहे.